## थोडक्यात

# मानसिक आजारांविषयी 'आरोग्यम् जनसंपदा'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पंख संस्था, क्विकहील फाउंडेशन आणि पुणे शहर पोलिस यांच्या वतीने 'आरोग्यम् मनसंपदा' हा मानसिक आजारांवर जनजागृती करणारा प्रकल्प नुकताच सुरू झाला आहे. हा प्रकल्प इयत्ता आठवी ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पुण्यातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. यात मानसशास्त्रातील तज्ज्ञ व्यक्तींमार्फत माहितीपर सत्रे घेतली जात आहेत. सर्वाधिक मानसिक आजारांचे प्रमाण विद्यार्थीदशेतील; तसेच वयात येणाऱ्या मुलांमध्ये वाढले आहे. अनेक गोष्टींचा मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम झाला असून, त्यातून ही मुले ताण, चिंता, नैराश्य, निद्रानाश अशांसारख्या मानसिक आजारांना बळी पडत आहेत. मुलांना मानसिक आजारांविषयी माहिती देऊन आजारावरील उपाय सांगितले जातात.